# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/05/2023 (गुरूवार) दुपार

---

## प्लास्टिक खुर्च्या चोरी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत वार्ड क्र. ११ खाटीक मोहल्ला सावनेर येथे दि. २३/०५/२०२३ चे २३/३० वा. ते दिनांक २३/०५/२०२३ चे २३/४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— लेखराज वसंतराव गोंडाणे, वय ३४ वर्षे, रा. वार्ड क्र. ११ खाटीक मोहल्ला सावनेर याच्या भावाचे दिनांक २१/०५/२०२३ रोजी लग्न झाले असून दिनांक २२/०५/२०२३ रोजी रिसेप्शन झाले. त्यासाठी आणलेले डेकोरेशनचे सामान फिर्यादीचे घरीच होते. नमुद घटना वेळी व ठिकाणी **आरोपी नामे—** १) **संदीप तेजराव उईके २) नंदु नारनवरे दोन्ही रा. वडार मोहल्ला पहलेपार सावनेर ३) राहुल गायकवाड रा. सावनेर** यांनी फिर्यादीचे घरासमोर मंडपात ठेवलेल्या दोन एसएमसी कंपनीच्या दोन लाल रंगाच्या प्लास्टीकच्या खुर्च्या जुनी वापरती किंमती अंदाजे १०००/— रू. चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वासनिक ब. नं. ८२१ मो. क्र. ९८२३१९६८२१ हे करीत आहे.

## ॲल्युमिनीअम तार चोरी

पो.स्टे. खापा :— अंतर्गत खापा शिवार येथे दिनांक २४/०५/२०२३ चे ००/०१ वा. ते ५/०० वा. दरम्यान महावितरण कंपनीचे खापा शहर वितरण केंद्र अंतर्गत येणाऱ्या रेल्वे क्रॉसींग खापा शहरातील महावितरणचा लघूदाब वाहीनीचे ॲल्यूमिनीअमचे तार अंदाजे ४०० मीटर अंदाजे रक्कम २०,०००/— रू. चे दिनांक २३/५/२०२३ च्या मध्यरात्री २.०० वा. सुमारास काही अज्ञात चोरांनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मन्नू भानू मेश्राम, वय ४० वर्ष रा. एम. एस. ई. बी. खापा यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नांदूरकर मो. नं. ८६०५३८१५९० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा पावडदौना झोपडपट्टी मौदा येथे दिनांक २३/०५/२०२३ चे ९/०० वा. ते १०/०० वा. दरम्यान यातील मौजा पावडदौना झोपडपट्टी रोड वरील ईन्डस टॉवर आय डी नं. १२९६२१२ या टावरवरील नेटवर्क बंद पडल्याने कंट्रोल रूम वरून माहिती मिळाल्याने फिर्यादीने टेक्निशीयन पंकज डोंगरे याचे सोबत टॉवरची पाहणी केली असता व्ही. आय. कंपनीची बेसबॅन्ड ६६३० किंमती अंदाजे ६०,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पवन सूधाकर मोरक, वय ३५ वर्ष, रा. दलतपूर ता. आष्टी जि. वर्धा ह. मु. प्लॉट नं. ४१० राय टावर वानाडोगरी नागपूर यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निशांत मेश्राम मो. क्र. ९७६३१६३१०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**